विद्या प्रसारक मंडळाचे

के.ग.जोशी कला व ना.गो.बेडेकर वाणिज्य(स्वायत्त),महाविद्यालय,ठाणे

मराठी भाषा अभ्यास मंडळ

(शैक्षणिक वर्ष: 2021-2022)

बैठक क्रमांक - २

विभाग : मराठी

दिवस : शनिवार

तारीख : २६ फेब्रुवारी २०२२

वेळ : सकाळी ११.०० वाजता

ठिकाण : आभासी मंच - "गूगल मीट"

सभेचे इतिवृत्त

मुद्दा क्र.२.०१: मराठी भाषा आणि साहित्य विभागाच्या अभ्यास मंडळाची सभा शनिवार दिनांक २६ फेब्रुवारी २०२२ रोजी सकाळी ११.०० वाजता गूगल मीट वर आभासी मंचाद्वारे (ऑनलाईन) मराठी भाषा विभागप्रमुख प्रा.संतोष लक्ष्मण राणे यांच्या अध्यक्षतेखाली संपन्न झाली.प्रा.संतोष राणे यांनी सभेचे प्रास्ताविक केले.

सभेला अभ्यास मंडळाचे खालील सर्व सदस्य उपस्थित होते.

| | |
|---|---|
| डॉ.नितीनआरेकर | मा.कुलगुरू मुंबई विद्यापीठ,नामनिर्देशित सदस्य. सहयोगी प्राध्यापक.सीएचएम महाविद्यालय,उल्हासनगर |
| डॉ.राजेंद्र सांगळे | (बाह्य विद्यापीठ सदस्य,सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ) |
| डॉ.रमाकांत कराड | (बाह्य विद्यापीठ सदस्य,सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ) प्राध्यापक,मराठी भाषाविभाग,आर.एन.सी.कला,आणिजे.डी.बी. वाणिज्य आणि एन.एस.सी.विज्ञान महाविद्यालय,नाशिक रोड,नाशिक. |
| कु.काजल थळे | गुणवंत माजी विद्यार्थिनी. |
| प्रा.संतोष लक्ष्मण राणे | अध्यक्ष - मराठी भाषा अभ्यास मंडळ, विभागप्रमुख-मराठी भाषा आणि साहित्य |
| प्रा.शिशिर आंगणे | सदस्य मराठी विभाग |
| प्रा.राजश्री माने-जाधव | सदस्या,मराठी विभाग |
| प्रा.रुपेश यशवंत महाडीक | सदस्य मराठी विभाग |

मुद्दा क्र.२.०२: मागील सभेचे दिनांक ३० जून २०२१ चे प्रमुख मुद्दे आणि कार्यवाही अहवाल (ATR) वाचण्यात आला.

| सूचना / शिफारस | कार्यवाही अहवाल |
|---|---|
| नवी पिढी टेक्नोसॅव्ही असल्यामुळे अभ्यासक्रमात ब्लॉग लेखन,गूगल साधने,ई-मेल,फेसबूक,इंस्टाग्राम,इत्यादी प्रगत लेखन कौशल्यांचा अभ्यासक्रमात समावेश करावा. | सूचनेच्या अनुषंगाने विद्यार्थ्यांना वर्गात सदर विषयाच्या कार्यशाळा घेण्यातआल्या. |
| मराठी भाषा १च्या अभ्यासक्रमात सत्र १ | सदर सूचनेनुसार प्रथम वर्ष कलाशाखेसाठी |

Scanned with CamScanner

| | |
|---|---|
| मधील सैद्धांतिक भागात चार नाटकांऐवजी दोनच नाटकांची चर्चा करावी.व त्यासाठी तासिकांची पुनर्रचना करावी. | बदल करण्यात आले. |

मुद्दा क्र.२.०३: प्रा.रुपेश महाडीक यांनी सध्याच्या द्वितीय वर्ष कला शाखेच्या अभ्यासपत्रिका क्रमांक २ व ३ या मराठी भाषा विषयाच्या ३ आणि सत्र ४ यांचा अभ्यासक्रम पीपीटी सादरीकरणाच्या माध्यमातून सर्वांना दाखविण्यात आला.प्रस्तावित अभ्यासक्रमाची सविस्तर चर्चा करण्यात आली.यावेळी सन्माननीय तज्ञ प्राध्यापकांनी काही मौलिक सूचना केल्या.त्या अनुषंगाने अभ्यासक्रमात बदल करून सदरच्या अभ्यासक्रमाला अभ्यासमंडळाकडून मान्यता देण्यात आली.

| सध्याचा अभ्यासक्रम | प्रस्तावित अभ्यासक्रम | संमत अभ्यासक्रम |
|---|---|---|
| दिवे गेलेले दिवस - रंगनाथ पठारे | 1. पेव्हरब्लॉक - मिलिंद बल्लाळ<br>2. सिंहासन - अरुण साधू<br>3. मुंबई दिनांक - अरुण साधू<br>4. त्रिशंकू - अरुण साधू | पेव्हरब्लॉक - मिलिंद बल्लाळ |

मुद्दा क्र.२.०४: प्रस्तावित पुस्तकांतील अरुण साधू यांची पुस्तके यापूर्वी विद्यापीठाने अभ्यासक्रमात समाविष्ट केलेली होती,त्यादृष्टीने वर्तमानाचा विचार करता आणि महाविद्यालय ज्या परिसरात आहे त्याच परिसराचा लेखाजोखा मांडणारे,स्थानिक पातळीवरील प्रश्नांचा वेध घेणारे मिलिंद बल्लाळ लिखित पेव्हरब्लॉक पुस्तकाचा समावेश अभ्यासक्रमात करण्याचा एकमताने ठराव मंजूर करण्यात आला. सर्वच सदस्यांनी त्याला अनुमोदन दिले.

मुद्दा क्र.२.०५: द्वितीय वर्ष कला शाखेच्या अभ्यासपत्रिका क्रमांक २, सत्र - ३ यातील घटक ३ मध्ये आत्मकथन,जसं घडलं तसं-निलंम माणगावे यांच्या पुस्तकाला पर्याय म्हणून

| सध्याचा अभ्यासक्रम | प्रस्तावित अभ्यासक्रम | संमत अभ्यासक्रम |
|---|---|---|
| जसं घडलं तसं-निलंम माणगावे | 1. मी वनवासी- सिंधुताई सकपाळ<br>2. रास -सुमा करंदीकर<br>3. ताई मी कलेक्टर व्हयनू-राजेश पाटील<br>4. तीन दगडांची चूल- विमल मोरे<br>5. बॅरिस्टरचे कार्ट- डॉ.हिम्मतराव बावस्कर<br>6. आयदान-उर्मिला पवार | ताई मी कलेक्टर व्हयनू-राजेश पाटील |

ही पुस्तके प्रस्तावित म्हणून मांडण्यात आली.सदर पुस्तकांवर सदस्यांनी चर्चा करून सध्या तरुणांनी वेगळी वाट चोखाळावी,आणि त्यांना प्रेरणादायी,उत्साह वाढविणारे,स्पर्धा परीक्षांमध्ये उज्वल कामगिरी करण्यास पाठबळ मिळेल या अनुषंगाने ताई मी कलेक्टर व्हयनू - राजेश पाटील यांचे आत्मकथन अभ्यासक्रमात समाविष्ट करण्याचा प्रस्ताव एकमताने मंजूर करण्यात आला.

मुद्दा क्र.२.०६: द्वितीय वर्ष कला शाखेच्या अभ्यासपत्रिका क्रमांक ३, सत्र ३ आणि ४ यातील कोणताही भाग न वगळता अतिरिक्त विभागाचा समावेश करण्याचा प्रस्ताव सादर करण्यात आला.

Scanned with CamScanner

| सध्याचाअभ्यासक्रम | प्रस्तावित अतिरिक्त अभ्यासक्रम | संमतअभ्यासक्रम |
|---|---|---|
| भाषा आणि भाषा अभ्यास<br>१ अ) घटक एक मानवी भाषेचे स्वरूप<br>आ) भाषेची विविध कार्ये<br>२ अ) भाषासमाज आणि संस्कृती<br>आ) भाषेचा विकास आणि -ह्रास<br>३ अ) भाषा प्रमाणभाषा आणि बोली<br>आ) बोलींच्या अभ्यासाची गरज व महत्व | भाषाभ्यासाची विविध अंगे- ध्वनिविचार, व्याकरण, अर्थविचार, शब्दसंग्रह | भाषाभ्यासाच्या विविध अंगांचा परिचय |

अतिरिक्त म्हणून भाषाभ्यासाची विविध अंगे - ध्वनिविचार, व्याकरण, अर्थविचार, शब्दसंग्रह हे प्रस्तावित करण्यात आले,मा.सदस्य डॉ.नितीन आरेकर सर यांनी त्यात बदल सुचवला,जो पुढीलप्रमाणे- भाषाभ्यासाची विविध अंगे हे विस्तृतपणे न मांडता भाषाभ्यासाच्या विविध अंगांचा परिचय म्हणून घेण्यात यावा.सदर सूचनेला इतर सर्व सदस्यांनी अनुमोदन दिले.

**मुद्दा क्र.२.०७: आगरी बोलीतील निवडक कवितांचा अभ्यास यातही कोणताही अभ्यासक्रम कमी न करता अतिरिक्त म्हणून कवीं श्री.योगेश चिकणे यांच्या ४ कविताचा समावेश करण्याचा प्रस्ताव सादर करण्यात आला**

| सध्याचा अभ्यासक्रम | अतिरिक्त समावेश |
|---|---|
| आगरी बोलीतील निवडक कवितांचा अभ्यास:<br>१) सारेवाराचा पलाट, मायच्या सुरक्याची गोदरी- प्रा. एल्. बी. पाटील<br>२) आगरी-कोळी, आय - चंद्रकांत मढवी<br>३) आवचा आगोर - डॉ. संजीव म्हात्रे<br>४) मीठ, नवी मुंबई- रामनाथ म्हात्रे<br>५) इनकूरी, आमी जातीच हाव आगरी- पुंडलिक म्हात्रे<br>६) जमिनीचा तुकरा - म. वा. म्हात्रे<br>७) वंदर, खोपट- मुकेश कांबळे<br>८)आलं कंपनीवालं आलं - सौ. सुनंदा मोडखरकर<br>९)पायंडा- सौ. शोभना रामकृष्ण पाटील<br>१०)एस. ई. शेड नवरा- गणपत म्हात्रे<br>११)खलाटी- अविनाश पाटील<br>१२) दिप्तीला गाव सारा धावला-दिनानाथवेटू पाटील<br>१३) आमचेकरं आता परकल्प आयलंय विश्वास ठाकूर, नेरुळ<br>१४) भाकरी शून्य- सौ.दमयंती भोईर | श्री.योगेश चिकणे -<br>हुंडा देत नी ना झेत नी<br>डाल मुंडी<br>उंबरा-उंबरी<br>कावल्यांचा भाव |

सर्व सदस्यांनी त्याला अनुमोदन दिले.

Scanned with CamScanner

त्यत खेळीमेळीच्या वातावरणात,सकस चर्चात्मक पद्धतीने सभा संपन्न झाली,सर्व सदस्यांनी कोरोना संपून पुढील सभा आभासीमंचाद्वारे न होता,प्रत्यक्षात व्हावी आणि आम्हांला महाविद्यालयाला प्रत्यक्षात भेट देता यावी ही सदिच्छा व्यक्त केली.

त्यानंतर प्रा.राजश्री माने-जाधव यांनी जोशी-बेडेकर स्वायत्त महाविद्यालयाच्या प्राचार्या डॉ. सुचित्रा नाईक, उपप्राचार्य सुभाष शिंदे, उपप्राचार्या डॉ. प्रियंवदा टोकेकर, उपप्राचार्य डॉ. महेश पाटील,ग्रंथालय प्रमुख प्रा.नारायण बारसे या सर्वांचे त्यांच्या मार्गदर्शनासाठी व सहकार्यासाठी मनःपूर्वक आभार मानले. तसेच अभ्यास मंडळाच्या सर्व सदस्यांचेही आभार मानले. अभ्यास मंडळाची सभा १२ वाजून ०५ मिनिटांनी संपन्न झाली.

प्रा.संतोष लक्ष्मण राणे
अध्यक्ष - मराठी भाषा अभ्यास मंडळ

JOSHI & BEDEKAR COLLEGE OF ARTS & COMMERCE AUTONOMOUS V.P.M's THANE

प्रा.सुचित्रा नाईक
प्राचार्या
Principal
K. G. Joshi College of Arts &
N.G. Bedekar College of Commerce Autonomous
Thane.

Scanned with CamScanner